



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २३२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०३ एप्रिल २०२५







## खामगाव -शेगाव मार्गावर मोठा अपघात ; ७ जणांचा मृत्यू!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, बुलडाणा :** खामगाव -शेगाव मार्गावरील ब्रह्मांडनायक लॉन्स समोर बुधवारी, २ एप्रिलला झालेल्या अपघातातील पाच मृत आणि जखमीची ओळख पटली आहे. यात बुलढाणा जिल्ह्यातील एकाचा समावेश आहे. एसटी बस, ट्रॅव्हल्स व बोलेरो एकमेकांना धडकले. बोलेरो ( एम एच २८-३३१४ ही शेगाव वरून खामगाव कडे येत असताना , पुणे इथून परतवाडाकडे जाणारी एसटी बसला(क्रमांक एम एच १४ -२३४४) बोलेरो ने धडक दिली, त्यानंतर उभ्या असलेल्या एसटी बसला नाशिक येथून अमरावती येथे जाणारी इंद्राणी ट्रॅव्हल्स (एम एच १५ ४०४१) ला मागून धडक दिली.



सदर अपघातामध्ये बोलेरो मधील धनेश्वर मरावी राहणार मध्य प्रदेश, कृष्णकुमार मोहन सिंह सरोते वय २० वर्ष, शिवपाल, शिवाजी समाधान मुंडे वय ५५ वर्ष राहणार एसबीआय कॉलनी शेगाव व इंद्राणी ट्रॅव्हल्स मधील मेहरुनिसा शेख हबीब वय ४५ वर्ष राहणार धुळे मालेगाव असे चार पुरुष व एक महिला ठार झाले.

जखमीची नावे पुढीलप्रमाणे आहे. शिव धनसिह धुर्वे वय ४७ वर्ष राहणार मध्य प्रदेश कोमल गणेश गंधारे वय ५९ वर्ष राहणार अहमदनगर , वांगे प्रतीक्षा मुकुंदराव वांगे वय २६वर्ष रा. ब्राह्मणवाडा थळी तालुका चांदुर बाजार, अमरावती, सत्यपाल गुलाबराव गवई वय ४० वर्ष रा. लावखेड तालुका पातुर जिल्हा अकोला, सुमन सुखदेवराव भोंडे वय ७० वर्ष रा. अंजनगाव सुर्जी जिल्हा अमरावती,सुखदेव अमृत भोंडे वय ८१ वर्ष रा. अंजनगाव सुर्जी, दत्ता रामधन मोरखडे वय ४५ वर्ष रा. हिवरखेड रुपराव तालुका तेल्हारा , बापूराव रामकृष्ण सवाने वय ८० वर्ष रा. वझर मेग तालुका निफाड जिल्हा नाशिक, साजिया परवीन शेख हबीब वय १० वर्ष रा. धुळे मालेगाव,शेख हबीब अब्दुल रजाक वय ५० वर्ष रा. धुळे मालेगाव, रंजीत वानखेडे वय ४० वर्ष रा.मूर्तिजापूर, धनराज नागोराव उगले वय ३७वर्ष रा. बेलोरा विमानतळ अमरावती,आशिष सुखदेवराव नवले वय ४० वर्ष रा. अमरावती, प्रल्हाद शिवरामजी आवंडकर वय ७५ वर्ष रा. अंजनगाव सुर्जी अमरावती, वरद चित्रांगण रेवंदले वय ६ वर्ष रा. कुणाला फुरसुंगी बाग पुणे,वंदना देवानंद पांडवकर वय ५१ वर्ष रा. अंजनगाव सुर्जी, पुरुषोत्तम नारायण शिनकर वय ७२ वर्ष रा. करजगाव तालुका चांदुर बाजार, शालिनी पुरुषोत्तम शिनकर वय ६५ वर्ष रा. करजगाव तालुका चांदूरबाजार.

## शिर्डी विमानतळावरुन रात्रीच्या विमानसेवांना सुरुवात...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, ठाणे :** शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर रात्रीच्या विमानसेवांना अधिकृतपणे सुरुवात करण्यात आली आहे. धावपट्टीच्या डांबरीकरणाचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाल्याने ही ऐतिहासिक सुविधा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी) आणि संबंधित नियामक संस्थांच्या प्रयत्नांमुळे शिर्डीतील हवाई वाहतूक सेवा नव्या उंचीवर पोहोचली आहे.

या नव्या टप्प्याचा लाभ यात्रेकरूंना तसेच पर्यटकांना होणार असून, इंडिगो एअरलाइन्सने सेवेत दोन नवीन विमानांची भर घातली आहे. विशेषतः, हैदराबाद-शिर्डी-हैदराबाद मार्गावर ७८ प्रवाशांच्या क्षमतेचे नियमित विमान सुरू करण्यात आले आहे. ही सेवा गुढीपाडवा आणि उगादीच्या शुभप्रसंगी यात्रेकरूंना भेट म्हणून सुरू करण्यात आली आहे.




या विस्तारामुळे शिर्डी विमानतळ दररोज एकूण ११ विमानांची (२२हालचाली) हाताळणी करेल, ज्याद्वारे दररोज सुमारे २२०० प्रवाशांना सेवा देण्यात येईल. हे पायाभूत सुविधा आणि हवाई वाहतूक क्षेत्रासाठी मोठे यश मानले जात आहे.

श्री साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी आणि पहाटे ४ वाजता होणाऱ्या काकड आरतीला उपस्थित राहण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे. अनेक विमान कंपन्यांनीही शिर्डीसाठी अधिक सेवा सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.


शिर्डी विमानतळावर रात्रीच्या कालावधीत विमानसेवा सुरू होणे हे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे शक्य झाले आहे.

या ऐतिहासिक क्षणाबद्दल बोलताना, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी सांगितले की, ही सुविधा केवळ हवाई वाहतूक क्षेत्रासाठीच नाही, तर धार्मिक पर्यटनालाही चालना देण्यासही मदत करणारी ठरेल. शिर्डीच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे भविष्यात येथे आणखी सेवा उपलब्ध करून दिल्या जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचा पेपरलेस कारभार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, नवी मुंबई :** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२५ / प्र.क्र.७ / र.व का. १, दिनांक १३ जानेवारी २०२५ नुसार राज्य शासनाने क्षेत्रीय, शासकीय व निमशासकीय कार्यालयांकरिता १०० दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत नमूद मुद्द्यांवर प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सूचना / निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमात ई - ऑफिस तसेच रजा व्यवस्थापन प्रणाली (लिव्ह मॅनेजमेंट सिस्टीम - एलएमएस) प्रणाली अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. शासकीय कामकाजात सुसूत्रता यावी, दस्तऐवज सुरक्षित राहावे आणि निर्णय प्रक्रिया गतिमान व सुलभ व्हावी याकरीता सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांत तसेच क्षेत्रीय कार्यालयांमध्ये शासकीय कामकाज ई-ऑफीस प्रणालीद्वारे करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमामध्ये दि.१३ जानेवारी २०२५ रोजी परिपत्रक निर्गमित करून सर्व कार्यालयीन कामकाजाकरिता ई-ऑफीसाचा वापर सुरू करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत परिवहन उपक्रमात माहे जानेवारी २०२५ ते माहे मार्च २०२५ पर्यंत ई - ऑफिसद्वारे ७९१ नस्ती तयार करण्यात आलेल्या आहेत.



ई-ऑफिस प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे कामात गती आणि कार्यक्षमतेत वाढ झालेली आहे आमि वेळेची मोठी बचत होत आहे. त्याचप्रमाणे ई-ऑफीसमुळे उपक्रमाच्या कामात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे.

ई- ऑफिस मुळे सर्व दस्तऐवज डिजिटली संग्रहित केले जातात, त्यामुळे सर्व रेकॉर्ड्स सुस्थितीत ठेवण्यास मदत होत आहे. तसेच कागद व स्टेशनरीवरील खर्च कमी झालेला आहे. याशिवाय दस्तऐवज सुरक्षित ठेवणे जास्त सोयीचे झाले आहे. तसेच पासवर्ड आणि अन्य सुरक्षा वैशिष्ट्यांचा वापर केल्याने सुरक्षितता वाढली आहे.यासोबतच नस्ती किंवा कागदपत्रे शोधणे सोपे झाले आहे.

ई-ऑफिसमुळे अधिकारी व कर्मचारी २४ तास कामगिरी करण्यास सक्रीय होऊन त्यांना इतर ठिकाणांहून काम करता येत असून त्यामुळे कामात जलद गती आली आहे.

ई - ऑफिस प्रणालीमुळे परिवहन उपक्रमाच्या कामकाजात पारदर्शकता येऊन कामाचा निपटारा जलद गतीने होत असल्याचे नमुंमपा परिवहन उपक्रम प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

## थोडक्यात

### पिंपरी-चिंचवड: आगीमध्ये चार दुकानं जळून खाक तीन जण किरकोळ जखमी !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** पिंपरी- चिंचवड मध्ये सायंकाळी पाचच्या सुमारास नेहरू नगर येथील झिरो बॉईज चौकात गादी बनवणाऱ्या कारखान्याला आणि फर्निचरच्या दुकानाला भीषण आग लागली. या घटनेत दुकानाच्या वर असलेल्या इमारतीतील तिघांना किरकोळ दुखापत झाली आहे. जखमींना तातडीने महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल करण्यात आल आहे.

शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी वर्तवला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नेहरूनगर मधील झिरो बॉईज चौकात पाचच्या सुमारास भीषण आग लागल्याची वर्दी मिळाली. अग्निशमन दलाची दोन वाहन घटनास्थळी दाखल झाली होती. तसेच तीन व्यक्ती अडकल्याची भीती देखील व्यक्त केली जात होत होती. त्यांना देखील सुखरूप बाहेर काढण्यात आलं. किरकोळ जखमी असलेल्या तिघांना महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल करण्यात आल आहे. आगीच रौद्ररूप बघता एकूण नऊ अग्निशमनची वाहन घटनास्थळी पोहोचली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पाण्याचे फवारे मारण्यात आले. अखेर एक तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाला यश आल आहे. या आगीमध्ये चार दुकानात जळून खाक झाली आहेत. तसेच दुकानाच्या वर असलेल्या इमारतीला झळ पोहचली आहे.

### विंचूरच्या देशमुख परिवारातील युवकाचे अपघाती निधन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील सेवानिवृत्त तलाठी उल्हास देशमुख यांचा मुलगा प्रतीक देशमुख वय (३३) यांचे गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला अपघाती दुःखद निधन झाले. चाकण (पुणे) येथे क्वालिटी इंजिनिअर म्हणून कार्यरत होते. कामासाठी जात असताना एका अज्ञात वाहनाच्या धडकेत त्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. त्यांच्या पश्चात आई, वडील, बहीण, पत्नी व तीन वर्षाचा मुलगा आहे.

प्रतीक उल्हास देशमुख यांचे अपघाती दुःखद निधन झाल्याची बातमी विंचूरमध्ये समजताच हळहळ व्यक्त करण्यात आली. उल्हास देशमुख सेवानिवृत्त तलाठी यांचा 'तो एकुलता एक मुलगा असून माजी पंचायत समिती सदस्य भैय्यासाहेब देशमुख यांचे ते पुतणे होते. थोड्याच दिवसांत प्रतिक देशमुख हे नाशिक येथे कंपनीमध्ये शिफ्ट होणार होते, परंतु नशिबाची साथ त्यांना मिळाली नाही.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या खुर्चीची जप्ती दहा तारखेपर्यंत टळली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, बुलडाणा :** संपूर्ण जिल्ह्याचे सनियंत्रण करणारे आणि जिल्ह्यातील प्रशासकीय वर्तुळाला ज्याचा वचक राहतो त्या, जिल्हाधिकारी कार्यालयातील खुर्चीची जप्ती टळली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे खुर्ची आणि साहित्य जप्तीचे आदेश घेऊन राहुल दाभाडे आणि बुलढाणा न्यायालयाची चमू बुलडाणा जिल्हाधिकारी कक्षात २ एप्रिलच्या दुपारी येऊन धडकली! चिखली तालुक्यातील मोहदरी येथील एका लढवय्या शेतकऱ्याची जिद्द आणि न्यायालयाचा आदेश यामुळे हा घटनाक्रम घडला. मात्र कक्षातील कर्मचाऱ्यांनी विनवणी करून शेतकऱ्याला १० एप्रिलच्या आत आर्थिक मोबदला देण्याचे लेखी पत्र दिले. यामुळे ही चमू माघारी फिरली आणि जिल्हा कचेरीची मोठी नामुष्की तूर्तास टळली!

**काय आहे प्रकरण ?**

या प्रकरणातील शेतकऱ्याची जमीन ब्राम्हणवाडा लघुसिंचन प्रकल्पासाठी शासनाने भूसंपादित केली होती. मात्र शासनाकडून शेतकऱ्याला अपेक्षित मोबदला मिळाला नव्हता. पीडित शेतकऱ्याने प्रकरण १९९८ मध्ये न्यायालयात दाखल केले होते. १३ जुलै २०१२ रोजी या प्रकरणी न्यायालयाने शेतकऱ्याला मोबदला देण्याचे निर्देश शासनाला दिले होते. मदतीचा एक टप्पा शेतकऱ्याला २०१४ मध्ये मिळाला होता. मात्र अद्यापही शेतकऱ्याची शासनाकडे ८२ हजार ४९३ एवढी रक्कम घेणे बाकी आहे. तब्बल १० वर्षे उलटून देखील मोबदला न मिळाल्याने न्यायालयाने ब्राम्हणवाडा लघुसिंचन प्रकल्पाचे भूसंपादन अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांची खुर्ची व फर्निचर साहित्य जप्त करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार ॲड. राहुल दाभाडे आणि पीडित शेतकरी मालमत्ता जप्तीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आल्यानंतर एकच खळबळ उडाली. चिखली तालुक्यातील मोहदरी येथील चंद्रभागा उतपुरे यांची १ हेक्टर शेती ब्राह्मणवाडा लघु सिंचन प्रकल्पासाठी शासनाने भूसंपादित केलेली होती. १९९८ मध्ये त्यांना शासनाकडून ४१ हजार ५७२ रुपये मिळाले होते. मात्र अपेक्षित मोबदला मिळाला नसल्याची तक्रार शेतकऱ्याने केली होती. २०१२ मध्ये या प्रकरणाचा निकाल लागून शेतकऱ्याला व्याजासह रक्कम देण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. २०१४ मध्ये शासनाकडून चंद्रभागा उतपुरे यांना ३३ हजार १६३ रुपये देण्यात आले मात्र अद्यापही शासनाकडून आजच्या तारखेत ८२ हजार ४९३ घेणे बाकी आहे. या संदर्भात शेतकऱ्याला मदत न मिळाल्याने चंद्रभागा उतपुरे यांनी न्यायालयाचे दार पुन्हा ठोठावले.

या प्रकरणात ११ मार्चला दिवाणी न्यायाधीश ( वरिष्ठ स्तर )एच एस भोसले यांनी ब्राह्मणवाडा लघु सिंचन प्रकल्पाचे भूसंपादन अधिकारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील खुर्ची सह फर्निचर साहित्य जप्त करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार न्यायालयाचे कर्मचारी आज कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आले . मात्र सहाय्यक महसूल अधिकारी शैलेश गिरी यांनी १० एप्रिलच्या आत यावर आवश्यक ती कार्यवाही करणार असल्याचे लेखी पत्र दिले. संबंधित अधिकाऱ्याला तसे आदेश तत्काळ देण्यात आले. त्या परिणामी सध्यातरी ही जप्तीची कारवाई टळली आहे.



# संपादकीय

## वाढती वाहनसंख्या...


आपल्याही दारात आपली स्वतःची गाडी असावी असे प्रत्येक व्यावहारिक माणसाचे स्वप्न असते. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अनेकांना मुहूर्त सापडतो तो गुढीपाडवा, दसरा किंवा दिवाळीचा. या तीन सणांना गाड्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी आणि विक्री होती. यंदा गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्यात ८६ हजार ८१४ वाहन खरेदीची नोंद झाल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले. वाहन खरेदीचे हे प्रमाण मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल ३० टक्यांनी वाढले आहे. या वाहन खरेदीमध्ये अर्थातच शहरवासीय आघाडीवर आहेत. पुणे, मुंबई, नाशिक आणि ठाणे शहर पहिल्या पाचांत आहेत. शहरांत पूर्वी सर्वच गाड्या पेट्रोल डिझेलवर चालणाऱ्या असत, त्यानंतर सीएनजीचा पर्याय आला. इंधनखर्च वाचावा म्हणून लोकांनी आपल्या जुन्या गाड्या विकून सीएनजीवर चालणाऱ्या गाड्या खरेदी केल्या आता विजेवर म्हणजेच बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या बाजारात येऊ लागल्या आहेत त्यामुळे लोकांकडून या गाड्यांना अधिक पसंती मिळू लागली आहे. टॅक्सी रिक्षा यांच्याप्रमाणे खासगी वाहनांच्या खरेदी विक्रीवर कोणतेच बंधन नसल्याने शहरातील वाढती वाहनसंख्या डोकेदुखी ठरू लागली आहे.

मुंबईतील वाढत जाणारी वाहनांची संख्या विचारात घेता भविष्यात मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागण्याची दाट शक्यता आहे. लोकसंख्येच्या भस्मासुराने मुंबईला आधीच गिळंकृत केले आहे. याचा भार लोकलगाड्या, बसगाड्या, टॅक्सी आणि रिक्शा यांवर पडत आहे. यांवर पर्याय म्हणून सुरु केलेली मोनो आणि मेट्रो रेल्वेही कमी पडू लागल्या आहेत. आजमितीला मुंबईकरांचे राहणीमान उंचावल्याने आणि लोकल अन् बस गाड्यांतील जीवघेणी गर्दी नकोशी वाटू लागल्याने सर्वसामान्य मुंबईकरही स्वत:च्या मालकीचे वाहन घेऊ लागला आहे. व्यवसायासाठी घेतल्या जाणार्या रिक्शा-टॅक्सींसह, ‘ओला’, ‘उबेर’ यांसारख्या वाहतूक आस्थापनांच्या माध्यमांतून व्यवसाय करण्यासाठी विकत घेण्यात येणार्या वाहनांचीही दरवर्षी यांमध्ये भर पडत आहे. वाढत जाणार्या वाहनांच्या तुलनेत मुंबईतील रस्त्यांची संख्या आणि आकारमान मर्यादित आहे. मुंबईतील इंच इंच जागेला सोन्याचा दर असल्याने गाड्या उभ्या करण्यासाठी मोकळ्या जागाही कमी पडत आहेत. रस्त्यांवर उभ्या केल्या जाणाऱ्या गाड्या वाहतुकीला अडथळा ठरत आहेत. त्यामुळे वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे. दर वर्षी मुंबईतील वाहनांच्या संख्येत दोन ते तीन लाख वाहनांची भर पडते. पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे दर वाढले असले तरी मुंबईकरांच्या हौसेपुढे ते नगण्य आहेत असेच म्हणावे लागेल. सद्यस्थितीत राज्यभरातील एकूण वाहनांपैकी १० टक्क्यांहून अधिक वाहने इवल्याशा मुंबईच्या रस्त्यांवरून फिरतात. मुंबईतील रस्त्यांची एकूण लांबी सुमारे १९०० किलोमीटर आहे. एकूण वाहनांची संख्या पहाता प्रति किलोमीटरमागे मुंबईत २३६८ वाहने आहेत. ‘मुंबईतील सर्व वाहने एकाच दिवशी रस्त्यावर आली, तर रस्त्यावरून चालण्याकरिता जागाच शिल्लक रहाणार नाही.’ असे मत वाहतूकतज्ञांनीही व्यक्त केले आहे. या आकडेवारीतूनच भविष्यात मुंबईचे काय होणार याचा अंदाज येतो.

मुंबईतील वाढत जाणारी वाहनसंख्या वायू आणि ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात भर घालत आहे. परिणामी नागरिकांना विशेषत: लहान मुलांना आणि वयस्कांना श्वसनाचे आणि फुफ्फुसांचे विकार जडत आहेत. मुंबईत चालू असलेले मेट्रो-मोनो रेल्वे प्रकल्प, तसेच विविध कामांसाठी रस्त्यांत नियमितपणे होणारे खोदकाम या सर्वांचा परिणाम वाहतुकीच्या गतीवर होत असतो. त्यामुळे शहरातील सिग्नल यंत्रणेवर वर्दळीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात ताण येतो. यांवर पर्याय म्हणून सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेत अवजड वाहनांना मुंबईत प्रवेशबंदी करण्यात आली होती; मात्र त्याचाही विशेष लाभ झाला नाही. जीएसटी आल्यानंतर ऑक्ट्रॉय नाकेही बंद झाल्याने मुंबईत येणाऱ्या वाहनांची संख्या आणखी वाढली आहे. वाहनसंख्येच्या क्रमवारीत मुंबईच्या पुढे असलेल्या देहली शहरात एक दिवस सम क्रमांक असलेली आणि एक दिवस विषम क्रमांक असलेली वाहने चालवण्याचा पर्याय शोधण्यात आला होता; मात्र याचा भार सार्वजनिक वाहतूक यंत्रणेवर पडत असल्याने मुंबई शहरात हा पर्यायसुद्धा उपयोगाचा नाही. मुंबईप्रमाणे नवी मुंबई, ठाणे, पुणे या प्रगतशील शहरांतही काहीशी अशीच परिस्थिती आहे. वाहनसंख्येची समस्या लवकरच रौद्र रूप धारण करू शकते. यासाठी राज्य प्रशासनाने चिंतन करून वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याचे आणि या भीषण समस्येविषयी लोकजागृती करण्याचे उपाय लवकरात लवकर शोधले पाहिजेत.

# जि.प.मराठी शाळेची पाटी अन लेखन...!

जिल्हा परिषद च्या मराठी प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत पाटी लेखन वापरून आम्ही अभ्यास करायचो. या पाटी अन लेखणीनं अक्षराची ओळख झाली.अश्या या शाळकरी पाट्या अनेक प्रकारच्या आहेत,त्यापैकी पहिला प्रकार म्हणजे दगडी चिनीमातीची. तिला लाकडी रीपांचे चारी बाजूंनी आवरण व पाटीच्या चौकोनी कोपऱ्यावर लोखंडी रिबीटने पॅक केलेले असायचे. विशेषत: ही पाटी शहान्नाव सत्यान्नाव च्या काळात महाराष्ट्र सरकारच्या प्रौढ शिक्षा अभियान म्हणजेच ग्रामीण भागातील प्रोढ, वयस्कर पुरुष,महिला यांना शिक्षित करण्यासाठी चालवण्यात येणाऱ्या अभियानासाठी वापरली जात होती व काही ठिकाणी बाजारात सुद्धा उपलब्ध होत्या, परंतु आमच्यासारख्या उनाड व खट्याळ पोरांसाठी शक्यतो ती चालत नसायची कारण, पाठीवरील दप्तराचे फेकणे, मित्रांच्या भांडणात कधी दप्तराच्या बंध हातात धरून भांडण तर कधी खेळातील व वस्तू वापरायच्या पद्धतीचा रांगडेपणा यामुळे,त्या दगडी चिनीमातीच्या पाट्या लगेच फुटायच्या, म्हणून आम्हां पोरांसाठी दुसऱ्या प्रकारातील पाटी की जी,पुरुष्टाच्या जाड लगद्यापासून बनवलेल्या असायच्या. पुठ्ठ्यापासून बनवलेली परंतु त्यांच्या दोन्ही बाजू अगदी सपाट त्यावर काळा रंग मारलेला असायचा. त्यावर पाण्याचा थेंब पडला तर ती फुगायची सुद्धा....! त्या पुठ्ठ्याला काळा रंग मारल्यानंतर साधारण आठ एम एम ची जाड अशी ही पाटी साधारण एक बाय दीड किंवा नऊ इंच बाय बारा इंच अशा वेगवेगळ्या आकाराच्या पुठ्ठ्यांच्या पाट्या बाजारात उपलब्ध असायच्या.त्यांना चारी बाजूने लोखंडी पत्राचं आवरण आणि त्यालाही लोखंडी रिबिट असायचे.त्या लोखंडी पत्र्यावर वेगवेगळ्या रंगाची डिझाईन असायची. आम्ही तिच्यावर एका बाजूला मराठी आणि दुसऱ्या बाजूला गणिताचा गृहपाठ किंवा शाळेतील अभ्यास करायचो. कधीकधी तर अशी गंमत व्हायची की, पाटीची एक बाजू जास्त चोपडी झालेली असायची. त्यावर दगडी लेखन लिहतांना घसरायची व त्यामुळे स्पष्ट उमटत नसे.तसं ते आमच्यासाठी हे फायद्याचेही राहायचं. ज्या दिवशी गृहपाठ करून आणला नाही, त्या दिवशी ती पाटी सरांजवळ घेऊन आम्ही थोडा चापलूसपणा करायचो.रांगेतील बैठकीनुसार पाटी तपासाचा नंबर येईपर्यंत




काहीतरी किडिमिडी लिहून त्यावर फक्त टोप्या म्हणजेच अक्षरावर वरील बाजूला रेषा मारायचो आणि हातानेच हलकसं पुसून अस्पष्ट करायचो आणि सरांना सांगायचो. गृहपाठ पूर्ण झाला आहे, सर! परंतु, तो दप्तरात दुसऱ्या पुस्तकाला लागून पुसला. सर हे बघा...! उलट खोटं बोलून अभिमानं सांगायचो जणू लय हुशार! कदाचित सरांच्या लक्षातही येत असेल पण वर्गातील तीस चाळीस पोरं पोरींच्या बाट्या तपासण्यात सर विशेष लक्ष देऊन बघत नसतील म्हणून,खडूनं बरोबरचा रिमार्क देऊन,छान! म्हणायचे. आदरणीय सरांची माफी मागतोय.. अशा बनवाबनवी बद्दल....! मात्र त्यातील काही हुशार विद्यार्थी त्या पाठीला पुसू नये म्हणून मेन कापडाचं कव्हर लावून आणायचे मग मात्र, त्यांच्यामुळे कधी- कधी मार पडायचा.बघा! बघा! पुसू नये म्हणून त्यांनी कशी व्यवस्थित पाटी पॅक करून आणली. अरे बाप ! तेव्हा मात्र आम्ही सगळे मिळून त्या हुशार महाशयाचा मध्यान्ह सुट्टीमध्ये चांगलाच समाचार घ्यायचो.

पाटी वापरून जास्त जास्त दिवस झाली तर,तिचा कोपऱ्यावरील लोखंडी पत्रा खराब होऊन निघून जायचा.त्यामुळे वर्गात बसल्यावर मांडीवर, पायाच्या पोटरीवर तुटलेला पत्रा घुसायचा. कारण त्यावेळेस आमचा शाळेचा गणवेश हाफ पांढरं शर्ट व खाकीच्या हाफ चड्ड्या होत्या. व फरशीवर खालीच चटईवर बसावं लागे.पाटीच्या उचकलेल्या पट्ट्या परत ठोक-ठोक करून वापरायचो. आणि खूपच खराब झाल्या तर, चारी बाजूनं काढून टाकायचो. मग शिल्लक राहायचा फक्त आतील पुठ्ठा....! त्याचेही हळूहळू चारी कोपरे खराब होऊन, घासून- घासून पाटी पूर्ण लांबट गोलाकार व्हायची.भूगोलातील अंडाकृती पृथ्वी सारखी...! कोपरे घासून घासून कमी झाल्यावर पुरेसं लिहिताही येत नव्हतं परंतु कसेतरी जुगाड करून चालवायचो....!

ह्या पुठ्ठ्याच्या पाटिबरोबर त्यानंतर प्लॅस्टिकचे आवरण वाल्या पाट्या बाजारात विक्रीसाठी आल्या.आतील भाग हा पुठ्ठयांचाच परंतु बाह्य आवरण मात्र लवचिक रबरी प्लास्टिकचे असायचे आणि थोडसं आम्हा मुलांना आकर्षित करण्यासाठी पाटीच्या अर्ध्या भागात दहा अकरा उभे बारीक तार लावून त्यात मनी ओवलेले असायचे. ते चढत्या क्रमाने पहिल्या तारामध्ये एक दुसऱ्या तारा मध्ये दोन असं जवळपास दहा तारांमध्ये दहा पर्यंत मनी ओवलेले असायचे. काही पाट्यांमध्ये रंगीबेरंगी मनी ओवलेले असायचे, त्यामुळे खूप छान व आकर्षक वाटायच्या. मनी मोजायला पण छान वाटायचे. मज्जा यायची...! कालांतराने अति वापराने म्हणावं किंवा आमच्या रांगड्या वापरामुळे म्हणा तिचीही प्लास्टिकची रिंग निघून जायाची मग ती आम्ही पोरं परत लावायचो व वापरायचो. अन खूपच खराब झाली तर आहेच भूगोलातील अंडाकृती पृथ्वी..!

यापूर्वीच्या पत्र्याच्या,दगडी चिनीमातीच्या,लाकडी आवरणाच्या, प्लास्टिक आवरणाच्या, पाट्यानंतर हल्ली बाजारात वेगवेगळ्या वेगवेगळ्या रंगाच्या पाट्या उपलब्ध आहेत. त्यावर लिहिण्यासाठी एक प्लास्टिकची स्टिक असते. त्या स्टिकने (बारीक काडीसारखी) त्यावर लिहायचे. त्याच्या वरील बाजूला एक मेन कापडासारखं आवरण की जे, लिहलेल्या अक्षरावर फिरवले की ते अदृश्य होते.परत लिहायला मोकळे. अश्या या मॅजिक पाट्याप्रमाणे मोबाईल,टॅबच्या आकाराच्या पाट्या हल्ली बाजारात उपलब्ध आहे. त्यांना पावर बटन असून स्क्रीनवर आपण बोटाने सुद्धा लिहू शकतो व त्याला मिटवू शकतो.

काळ्या पाटीवर लिहायचं तर,लिहिण्यासाठी त्यांचा अगदी विरोधी रंग म्हणजे पांढरा.कितीही दुरून बघा काळ्या रंगावर पांढऱ्या रंगाने लिहिले असता स्पष्ट दिसणारच...! अहो ! एवढंच काय जर, एखादी गोष्ट सूर्यप्रकाशा इतकी स्वच्छ, स्पष्ट व सत्य सांगायची असल्यास काळ्या दगडावरील पांढरी रेघम्हणून ही म्हणही तयार झाली असावी. ती माझ्या पाटी व लेखणीमुळेच...! पाटीवर लिहण्यासाठी आवश्यक अशी लेखन, चुना या पदार्थापासून बनवलेली असायची लेखिनीचे दोन प्रकार उपलब्ध होते व अजूनही आहे मात्र,सध्या पाटी व लेखन चा वापर कमी झाला. हल्ली इयत्ता पहिली पासून वही व पेन्सिलचा वापर होत असल्यामुळे शासकीय शाळा व इतर शैक्षणिक संस्थासुद्धा वापरत नाही असो...! दोन प्रकाराच्या लेखनी पैकी,एक लांबट चौकोनी आकाराची साधारण चार ते पाच इंची बाजारात उपलब्ध असायच्या व दुसरी गोलाकाराची दिसून येते. यातील चौकोनी काहीशी टणक तर गोलाकार थोडीशी ढिसूळ, ती लवकर संपायची.चौकोनी टणक मात्र बऱ्याच दिवस चालायची.या लेखनी आम्ही खायचो सुद्धा...! कदाचित आमच्या शरीरातील कॅल्शियम कमी झाल्यास खावीशी वाटत असावी अशी ही बहुगुणी लेखन..!

आम्हा खेड्यापाड्यातील मुलांच्या जीवनाला आकार देण्यासाठी, साक्षर बनवण्यासाठी, अक्षरज्ञानाची ओळख निर्माण करून देणारी व भविष्य घडवणारी ही पाटी आणि लेखन कायम स्मरणात राहील. काही जुन्या रूढी परंपरा व लोकप्रथेनुसार काळा रंग हा अशुभ समजला जातो मात्र, हा काळ्या रंग शाळेतील फलक व पाटीच्या रूपाने आयुष्यात येऊन कित्येकांच्या जीवनाचं सोनं केलं आणि भविष्य उज्वल केलं...!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## डाव...

जन मानसाचा कळे
कुणा लागला ठाव
पापण्या लवेपर्यतचं
उलटून टाकतो डाव

कधी कधी पितळेला
येतो सोन्यापेक्षाभाव
असंख्य असे खुर्च्यां
कार्यकर्त्याचा अभाव

वठणीवर आणे सर्वां
मतांचा जाणा प्रभाव
जन मता पुढे सांगावे
कुणाचा लागे निभाव

अंदाज हवा खोलीचा
कसा वाहतोयं प्रवाह
उपयोगी ना कामाचा
शक्तीशालीआविर्भाव

मुरड घालूनि रे ईर्षेला
बदल जरासा स्वभाव
अपयशाचे काळोखा
काजवे वसवतातगाव

आव्हान पेलू सामर्थ्ये
अबाधित ठेवा रे नाव
हार स्विकार संयमाने
पाठीउभे राहील गाव

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# वाहनांवर नियंत्रण आणायला हवे !

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पुणेकरांनी जोरदार वाहनांची खरेदी केल्याचे समोर आले आहे. गुढीाडव्याच्या दिवशी १० हजार १७० वाहनांची खरेदी केली. त्यात ६५१० दुचाकी, २४२४ चारचाकी, ५१७ गुड्स , २८३ रिक्षा, ६८ बस, २३४ टॅक्सी, १३४ अन्य वाहने पुणेकरांनी खरेदी केल्याची नोंद आरटीओत करण्यात आली. मागील वर्षापेक्षा या वर्षी वाहन खरेदीची संख्या तीन हजाराने अधिक आहे. मागच्या वर्षी याच काळात ७३३६ वाहनांची नोंद झाली होती याचाच अर्थ मागील वर्षी पेक्षा यावर्षी अधिक वाहनांची खरेदी पुणेकरांनी केली. आधीच पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात या दहा हजार वाहनांची भार पडली आहे. केवळ पुणे शहरातच एका दिवशी दहा हजारांपेक्षा अधिक वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई, ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची बाब समोर आली आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे पाच हजार वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे. नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. पुण्यामुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्यामुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# आयपीएल सामन्यांदरम्यानच्या जाहिराती...

सध्या आयपीएलचे सामने सुरु आहेत. जीओ हॉटस्टारने या सामन्यांच्या थेट प्रक्षेपणाचे हक्क खरेदी करून त्यांच्या अँपवर सामन्यांचे विनामूल्य प्रक्षेपण केले आत असल्याने प्रतिदिन हे सामने आठ ते दहा कोटी लोक लाईव्ह पाहत असतात ज्यामध्ये वयोवृद्धांपासून शाळकरी मुलांचाही सहभाग असतो.

प्रत्येक षटक झाल्यावर, खेळाडू बाद झाल्यावर,स्ट्रॅटेजिक टाइम आउट झाल्यावर लगेचच जाहिरात सुरु होते. यातील जवळपास सर्वच जाहिराती या गुटखा, पानमसाला आणि कोणत्या ना कोणत्या जुगार खेळण्यास प्रवृत्त करणाऱ्या ऑनलाईन अँप्सच्या असतात. एरव्ही कधीतरी दिसणाऱ्या या अँप्सच्या जाहिरातींचा लाईव्ह सामन्यांच्या दरम्यान सातत्याने मारा केला जात आहे ज्याचा परिणाम हे सामने पाहणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांवर आणि महाविद्यालयीन तरुण तरुणींवर होऊ शकतो.

गुटखा, तंबाखूयुक्त पानमसाला यांवर महाराष्ट्रासह अनेक राज्यांत बंदी आहे, तरीही ते खाणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. गुटखा, तंबाखू यांमुळे कर्करोगासारखे जीवघेणे रोग होतात तर ऑनलाईन जुगाराच्या नादी लागून आजतागायत कित्येकांचे आयुष्य उध्वस्त झाले आहे. सरकारला या दोन्ही गोष्टींतून वारेमाप कर मिळतो त्यामुळे सरकार त्यावर कोणतेही बंधन आणत नाही; मात्र अशा समाजविघातक जाहिरातींमुळे शालेय मुले, तरुण त्यांच्या आहारी जाऊन आपल्यासह आपल्या कुटुंबाची हानी करू शकतात याचा विचार कोण करणार ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात


## तृतीयपंथीयांच्या हक्कांचे ही होणार संरक्षण - उपमुख्यमंत्री

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, ठाणे :** राज्य शासन राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. यासाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना ही करण्यात आली आहे. तृतीयपंथी यांच्या हक्कांचे संरक्षण अधिक सक्षमतेने आणि प्रभावी होण्यासाठी या मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे, याबाबतचा निर्णय घेण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. या संबंधीच्या निर्णयाची प्रत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तृतीयपंथी समुदायाच्या प्रतिनिधींना सह्याद्री अतिथीगृह येथे देण्यात आली. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मंडळाच्या माध्यमातून तृतीयपंथीय समुदायाच्या शिक्षण, रोजगार आणि आरोग्य यासंदर्भातील विविध योजना राबवण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे तृतीयपंथीय समुदायाला अधिक सक्षम आणि न्याय्य प्रतिनिधित्व मिळेल, तसेच त्यांचे हक्क आणि कल्याण अधिक प्रभावीपणे सुनिश्चित करता येईल. सामाजिक न्याय मंत्री शिरसाट म्हणाले, सन २०१८ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या या मंडळाच्या संरचनेत बदल करून सुधारित स्वरूपात नव्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १३ अशासकीय सदस्यांची नियुक्ती रद्द करून त्याऐवजी नव्या सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी ११ मार्च २०२४ रोजी तृतीयपंथीयांसाठीचे धोरण - २०२४, जाहीर करण्यात आले होते. या धोरणानुसार राज्यस्तरीय मंडळाच्या संरचनेत सुधारणा करणे आवश्यक होते. नव्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्क संरक्षण आणि कल्याण मंडळाचे अध्यक्ष असतील. तसेच समाज कल्याण आयुक्त हे सदस्य सचिव असणार आहेत. तृतीयपंथीय प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी अशा अशासकीय सदस्यांचा ही मंडळात समावेश करण्यात आला आहे.

## लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये 'बाईक टॅक्सी' धावणार




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, ठाणे :** राज्यात नागरिकांना नाविन्यपूर्ण परिवहन सेवेच्या सुविधा देण्यासाठी राज्य शासन विविध उपक्रमांची अंमलबजावणी करीत आहे. याअंतर्गत नागरिकांना सुलभ परिवहन सेवा मिळण्यासाठी बाईक टॅक्सीला मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील किमान एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आता बाईक टॅक्सी धावणार असून याबाबतच्या धोरणास राज्य मंत्रिमंडळाच्या सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. रस्त्यावरील वाहन संख्या कमी होण्यासाठी खासगी दुचाकी वाहनांसाठी बाईक पुलिंगच्या पर्यायाला सुद्धा शासनाने मान्यता दिली आहे. अशा वाहनांना मोटार वाहन कायद्यांतर्गत योग्यता प्रमाणपत्र, विधीग्राह्य परवाना व विमा संरक्षण बंधनकारक असणार आहे. बाईक टॅक्सीच्या प्रवासी भाड्याचे दर हे संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाद्वारे निश्चित करण्यात येतील.

बाईक टॅक्सीमुळे कमी खर्चात प्रवासासाठी सुलभ पर्याय उपलब्ध होणार आहे. यामध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य राहणार आहे. या धोरणातंर्गत केवळ परिवहन संवर्गातील इलेक्ट्रीक बाईक टॅक्सीच धावणार आहेत. या योजनेमुळे नागरिकांना स्वस्त प्रवासाच्या पर्यायासह 'लास्ट माईल कनेक्टिव्हीटी' चा पर्याय उपलब्ध होणार आहे. यामुळे शहरातील प्रदूषण व वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ कमी होण्यास मदत होणार असून नवीन रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे. केवळ २० ते ५० वर्ष वयोगटातील चालकांनाच बाईक टॅक्सी सेवा देता येणार आहे. तसेच यामध्ये महिला प्रवाशांना महिला चालकाचा पर्याय निवडण्याची सोय उपलब्ध असणार आहे.

## श्री गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेला ४ कोटी ४५ लाख रुपयांचा नफा

### आर्थिक वर्षामध्ये ठेवींमध्ये ११ कोटींची वाढ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** श्री.गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेला दि.३१ मार्च २०२५ अखेर ४ कोटी ४५ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला असून संस्थेच्या ठेवीमध्ये ११ कोटी ०६ लाख रुपयांची वाढ झाल्याची माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन बा.ठ. झावरे यांनी दिली. लवकरच संस्था १५० कोटी रुपयांच्या ठेवीचा टप्पा पार करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या ८ शाखांच्या माध्यमातून व १४ वर्षाच्या वाटचालीमध्ये सभासदांना अत्याधुनिक बँकिंग सुविधा तसेच विविध प्रकारच्या ग्राहकभिमुख योजनांच्या माध्यमातून सेवा देण्याचा प्रयत्न संस्थेने केलेला आहे. ३१ मार्च २०२५ या आर्थिक वर्षात संस्थेकडे १३२ कोटी ६१ लाख रुपयांच्या ठेवी असून कर्ज वाटप ११४ कोटी ८९ लाख रुपये इतके आहे. संस्थेने विविध बँकांमध्ये ३० कोटी ०६ लाख रुपयांची सुरक्षित गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचा एकूण व्यवसाय २४७ कोटी ५० लाख रुपये इतका झालेला आहे. राखीव व इतर निधी १० कोटी २१ लाख रुपये, तर संस्थेची वार्षिक उलाढाल १ हजार ७५ कोटी रुपयांची झालेली आहे. संस्थेला थकबाकीचे प्रमाण अत्यल्प राखण्यास यश आलेले आहे.

सातत्याने संस्थेला ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त संस्थेने १४ वर्षे सातत्याने नफा मिळवताना ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त झालेला आहे. संस्थेने नवीन व प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे संस्थेची प्रगतीची घौडदौड चालु आहे. खातेदारांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतून रक्कम काढता यावी यासाठी संस्थेने कोअर बँकिंग प्रणालीचा स्वीकार केला आहे. संचालक मंडळाने नेहमीच सभासदांचे हित जपण्याचा प्रयत्न केलेला असून सर्व ग्राहकांनी व सभासदांनी संस्थेप्रती दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता सर्व संचालक मंडळ,ठेवीदार, कर्जदार, सर्वसामान्य ग्राहक, हितचिंतक व कर्मचारी वर्ग यांच्या पाठबळावर संस्था प्रगतीपथावर नेण्याचा प्रामाणिक व विश्वासास पात्र राहूनच प्रयत्न भविष्यकाळातही करणार असल्याचे अध्यक्ष बा.ठ.झावरे यांनी सांगितले.

## गडचिरोलीसह दुर्गम, अतिदुर्गम भागात संपर्क यंत्रणा निर्माण करण्यास राज्य शासन केंद्राला संपूर्ण सहकार्य करेल - मुख्यमंत्री

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, गडचिरोली :** ग्राम पंचायतीला वेगवान संपर्क यंत्रणा निर्माण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या 'भारत नेट प्रकल्प' टप्पा एक मध्ये महाराष्ट्राने दमदार कामगिरी केली आहे. आता टप्पा दोन राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत राज्यातही उर्वरित प्रत्येक ग्रामपंचायतीपर्यंत संपर्क यंत्रणा प्रस्थापित करण्यात यावी.

मुंबईतील बीएसएनएल आणि एमटीएनएलच्या मालमत्तांबाबत नगरविकास विभाग, बृहन्मुंबई महापालिका आणि केंद्रीय दूरसंचार विभागातील अधिकाऱ्यांची एक समिती तयार करण्याच्या सूचना देत समितीने चार आठवड्यात अहवाल द्यावा, असे निर्देशी केंद्रीय मंत्री सिंधिया यांनी दिले. राज्यामध्ये गडचिरोलीसह दुर्गम आणि अतिदुर्गम भागात संपर्क यंत्रणा निर्माण करण्यास राज्य शासन केंद्राला संपूर्ण सहकार्य करेल. या भागात संपर्क यंत्रणा उत्तम प्रकारे निर्माण झाल्यास येथील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे सोयीचे होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकी दरम्यान सांगितले.



मुंबईतील बीएसएनएलच्या मालमत्ता आणि महाराष्ट्रातील संपर्क यंत्रणा बाबत आयोजित बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार मुख्य सचिव सुजाता सैनिक, केंद्रीय दूरसंचार सचिव नीरजकुमार, बीएसएनएलचे व्यवस्थापकीय संचालक रॉबर्ट रावी आदी उपस्थित होते.

## रिझर्व्ह बँक भारताच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ

### डिजीटल व्यवहारांत देशाला जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात आरबीआयचा महत्वाचा वाटा- राष्ट्रपती मुर्मू



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, मुंबई :** भारत २०४७ मध्ये 'विकसित भारत' होण्याच्या दिशेने पुढे जात असताना, अर्थव्यवस्थेतील नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि समावेशक वित्तीय प्रणाली आवश्यक आहे. रिझर्व्ह बँक भारताच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ राहणार आहे.

भारताला डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा मोठा वाटा आहे. मजबूत बँकिंग प्रणाली, वित्तीय नवउपक्रम आणि ग्राहकांचा विश्वास कायम राखण्याच्या दृष्टीने याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिनांक ०१ एप्रिल २०२५ रोजी येथे केले. एनसीपीए नरिमन पॉईंट येथे आयोजित रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा उपस्थित होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९० व्या वर्धापन दिनाचा उत्सव आज साजरा करत आहोत.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या प्रतिष्ठित संस्थेच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर ही देशातील सर्वात महत्त्वाच्या संस्थांपैकी एक आहे. देशाची केंद्रीय बँक म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया भारताच्या अद्वितीय विकास प्रवासाच्या केंद्रस्थानी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतर स्थितीपासून ते आजच्या जागतिक महासत्तेपर्यंतच्या प्रवासात आरबीआय हा महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. १९३५ मध्ये स्थापन झालेली ही संस्था नेहमीच देशाच्या विकासाच्या प्रवासापेक्षा एक पाऊल पुढे राहिली असून या प्रवासात देशाचे नेतृत्वही केले असल्याचे राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या.आरबीआय केवळ केंद्रीय बँक नसून वित्तीय समावेशन व संस्थात्मक उभारणीमध्ये ही महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

संस्थात्मक बांधणीच्या दृष्टिकोनातून आरबीआय ने नाबार्ड, आयडीबीआय, सिडबी आणि नॅशनल हाऊसिंग बँक यांसारख्या महत्त्वपूर्ण वित्तीय संस्था स्थापन केल्या आहेत, ज्या शेती, लघु व्यवसाय आणि गृहनिर्माण क्षेत्रासाठी महत्त्वाचा पाठिंबा देतात. 'लीड बँक योजना' सारख्या उपक्रमांमुळे बँकिंग सेवा ग्रामीण भागांपर्यंत पोहोचवण्यात मदत झाली आहे. आर्थिक समावेशनाच्या दिशेने आरबीआय ने प्रधानमंत्री जनधन योजनेसाठी अनुकूल धोरणात्मक वातावरण निर्माण केले आहे. विशेषतः महिलांच्या मोठ्या संख्येने या योजनेत सहभागी होणे हा आर्थिक सक्षमीकरणाचा सकारात्मक बदल आहे.

भारताला डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात आरबीआय चा मोठा वाटा आहे. युपीआय सारख्या नाविन्यपूर्ण प्रणालींमुळे आर्थिक व्यवहार सहज, सुरक्षित आणि किफायतशीर झाले आहेत. याशिवाय, आरबीआय ने एक संपन्न वित्तीय-तंत्रज्ञान (फिन-टेक) पर्यावरण निर्माण करण्यासही मदत केली आहे. जसे-जसे भारत तंत्रज्ञानाधारित वित्तीय व्यवस्थेकडे वाटचाल करत आहे, तसे आरबीआय ग्राहक संरक्षण अधिक बळकट करत आहे आणि नव्या आव्हानांचा सामना करत आहे. आरबीआय ग्राहकांच्या विश्वासास प्राधान्य देत असून, ठेवीदारांसाठी विमा सुरक्षा, तसेच तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करत आहे.

'एकात्मिक लोकपाल योजना' (इंटिग्रेटेड ओम्बड्समैन स्कीम) द्वारे ग्राहकांना तक्रार निवारणाची सुलभ आणि पारदर्शक सुविधा मिळत आहे.वित्तीय साक्षरता ही ग्राहक संरक्षणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. आरबीआयच्या विविध मोहिमा आणि प्रकाशने नागरिकांना वित्तीय व्यवहारांतील जोखीम समजावून सांगतात, फसवणुकीपासून वाचण्यास मदत करतात आणि सुज्ञ आर्थिक निर्णय घेण्यास प्रोत्साहन देतात. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीसोबतच सायबर सुरक्षेच्या जोखमीही वाढत आहेत. त्यामुळे आरबीआय डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित करण्यासाठी सक्रिय पावले उचलत आहे. आरबीआय पर्यावरण पूरक धोरणांच्या दिशेने पावले उचलत आहे. हरित (ग्रीन) अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करताना आरबीआयने 'ग्रीन डिपॉझिट फ्रेमवर्क' आणि 'प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा' (प्रायोरिटी सेक्टर लँडिंग - पीएसएल) अंतर्गत हरित वित्त पुरवठा यासारख्या उपक्रमांद्वारे मोठे योगदान दिले आहे. आरबीआयने काळानुसार स्वतःला विकसित करत भारताच्या आर्थिक परिवर्तनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

महागाई नियंत्रण, वित्तीय समावेशन, आर्थिक स्थैर्य आणि मजबूत वाढ यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये त्याची भूमिका निर्णायक ठरली आहे. गेल्या ९० वर्षांत आरबीआयचा प्रवास सरकारच्या दृष्टीकोन आणि धोरणांशी सुसंगत राहिला आहे. आर्थिक सुधारणांपासून स्थिरतेपर्यंत, सरकार आणि आरबीआय यांचे सहकार्य देशाच्या आर्थिक वाढीसाठी उपयुक्त ठरले आहे. केवळ एका स्वाक्षरीने आरबीआयच्या गव्हर्नरच्या स्वाक्षरीने एक साधे कागदाचे तुकडे चलन बनते. ही ताकद दुसऱ्या कोणाच्याही स्वाक्षरीला नाही. सर्वसामान्य नागरिकांना आरबीआय सोबत थेट संपर्क नसतो, परंतु त्यांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांमध्ये आरबीआयचा अप्रत्यक्षपणे प्रभाव असतो. गेल्या नव्या दशकांत आरबीआयने कमावलेली सर्वात मोठी संपत्ती म्हणजे जनतेचा विश्वास. हा विश्वास कायम राखण्यासाठी आरबीआयने नेहमीच स्थिरता, आर्थिक प्रगती आणि वित्तीय सुरक्षेच्या उद्दिष्टांवर भर दिला आहे. १९९० च्या आर्थिक उदारीकरणापासून कोविड-१९ महामारीपर्यंत आरबीआयने वेगवान आणि प्रभावी उपाययोजना केल्या आहेत. तसेच, जागतिकीकरणाच्या काळातही देशाच्या वित्तीय व्यवस्थेची सुसूत्रता कायम राखली असल्याचे सांगून राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांनी रिझर्व्ह बँक व्यवस्थापनाचे अभिनंदन केले.

यावेळी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी रिझर्व्ह बँकेच्या योगदानाचे महत्व अधोरेखित करत जागतिक स्तरावर होत गेलेल्या गतीमान बदलांच्या पार्श्वभूमीवरही आरबीआयने आर्थिक बाबी नियंत्रित करण्यात ठामपणे बजावलेल्या कामगिरीचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विशेष स्टॅम्पचे अनावरण ही करण्यात आले.

## ओम साई प्रतिष्ठान आयोजित पायी दिंडी सोहळा रांजणगाव



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०२, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातीलरांजणगाव मशिद येथील ओम साई प्रतिष्ठान आयोजित पायी दिंडी सोहळा हा सालाबाद प्रमाणे १६ वे वर्षात पदार्पन करीत असुन रांजणगाव येथील साई मंदीरापासुन बुधवार, दिनांक ०२ एरील २०२५ रोजी सकाळी ९ वाजता साईंची आरती होऊन पायी दिंडी सोहळा अभियानाला आरंभ झाला. पायी दिंडी सोहळा हा शिर्डीकडे रवाना झाला असून पायी दिंडी सोहळा अभियानाला सुपा पंचक्रोशितील अनेक साईभक्त उपस्थित राहील्याचे चित्र पहावयास मिळाले.

त्यामधे गावचे सरपंच महेश देशमुख, माजी सरपंच बंटी साबळे, प्रितम ताई शिंदे, सेवा संस्थेचे चेअरमन अनिल जवक,रांजणगावचेच पण शिर्डीमध्ये वास्तव्यास राहिलेले प्रथम साई भक्त ज्ञानेश्वर जवक (माउली) आदी ग्रामस्त,महिला, परिसरातील साईभक्त मंडळीच्या उपस्थित हा पायी दिंडी सोहळा शिर्डीकडे प्रस्थान करण्यात आले. पायी दिंडी सोहळ्याचे नियोजन सालाबाद प्रमाणे ओम साई प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले.

## पाणी प्रश्नावर आ.समाधान आवताडे यांनी घेतली आढावा बैठक



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०२, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील नागरिकांना उन्हाळ्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी पंढरपूर पंचायत समिती सभागृहात आ. समाधान आवताडे यांनी बुधवारी पंढरपूर तालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक व सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पाणी टंचाई आढावा बैठक घेतली.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, नायब तहसीलदार बालाजी पूदलवाड यांच्यासह सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या आढावा बैठकीत अनेक सरपंच व सदस्यांनी पाणी टंचाईदूर करण्यासाठी गावागावातील ओढे, नाले, तलाव हे नीरा उजवा व उजनी मधून भरून घ्यावेत. पाणी मिळत नसूनही कर आकारणी केली जाते अशा तक्रारींचा पाढा लोकप्रतिनिधीसमोर वाचला.


नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी गावागावातील ओढे, नाले, तलाव भरून घ्यावेत. हातपंप सुरू करून वाड्या वस्त्यांपर्यंत पाणी पोहोचवा अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी घरकुल योजना यासह विविध विभागाचा आढावा घेतला. या आढावा बैठकीमुळे योग्य पाण्याचे नियोजन होणार असून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

# नवी मुंबई महानगरपालिकेने पहिल्यांदाच ओलांडले ८०० कोटी करवसूली रक्कमेचे उद्दिष्ट

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, नवी मुंबई :** महानगरपालिकेकडे मालमत्ताकर, पाणीपट्टी, बांधकाम परवानगी प्रस्ताव, परवाना शुल्क अशा विविध बाबींमधून जमा होणाऱ्या महसूलातूनच नागरी सेवा सुविधांची परिपूर्ती केली जात असते. याकरिता सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी सहकार्य केल्यामुळे करवसुलीची बहुतांशी प्रमाणात उद्दीष्टपूर्ती झाली असून त्याबद्दल महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी नवी मुंबईकर नागरिकांचे आभार व्यक्त केले आहेत. यामध्ये मालमत्ता कर विभागाने ८२६.१२ कोटी इतका मालमत्ता कर जमा केला असून त्यामध्ये अभय योजनेद्वारे थकीत मालमत्ताकरावरील शास्ती रकमेवर ५० टक्क्यांच्या सूटीचा लाभ घेत २०.९७ कोटी इतकी रक्कम जमा झालेली आहेव तितक्याच रक्कमेची सवलत थकबाकीदारांना झाले आहे. त्याचप्रमाणे पाणीपुरवठा विभागामार्फत १०५.९३ कोटी इतकी रक्कम जल देयकांमार्फत जमा झालेली आहे. पाणी पुरवठा विभागामार्फत देण्यात आलेल्या अभय योजनेचा लाभही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर घेतला. नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी पोटी ३८१.९० कोटी इतके शुल्क जमा झाले असून यामध्ये पुनर्विकास प्रकल्प



प्रस्तावांच्या मंजूरीचा मोठा भाग आहे. परवाना विभागानेही विविध परवानग्या विहित वेळेत दिल्याने १४.६० कोटी इतकी प्रत्यक्ष शुल्क जमा झालेली आहे. स्थानिक संस्था करापोटीही २८.०४ कोटी जमा झालेली आहे. तसेच इतरही विभागांमध्ये महसूल जमा होण्याचे प्रमाण लक्षणीय आहे.

सर्व विभागांनी १०० टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य केली असून हे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागप्रमुख व त्या त्या विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न महत्वाचे आहेत. या सर्वच अधिकारी - कर्मचारी वृंदाच्या उल्लेखनीय कामाची आयुक्तांनी प्रशंसा केली आहे. ही उद्दीष्टपूर्ती होण्यामागे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रत्येक विभागाच्या आहे. नागरिकांना सहजपणे आपली देयके भरता यावीत याकरिता आयुक्त महोदयांच्या संकल्पनेतून ऑनलाईन प्रणालीवर विशेष भर देण्यात आला. ऑनलाईन देयके भरताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नविन ऑनलाईन मालमत्ता संकलन प्रणाली सुरु करण्यात आली.

महानगरपालिकेच्या संकेतस्थळाप्रमाणेच स्वतंत्र ॲप कार्यान्वित करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. नेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, क्यूआर कोड तसेच महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात रोख / धनादेश / डीडी अशी विविध माध्यमे देयके भरणा करण्यासाठी उपलब्ध असल्याने तसेच ऑनलाईन प्रणालीद्वारे घरबसल्या देयके अदायगीची सुविधा लाभल्याने नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद लाभला.

यासोबतच मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकीदारांना नोटीसा देणे, त्यांचे नळ कनेक्शन बंद करणे अशी कारवाई देखील करण्यात आली.नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेत मालमत्ताकर भरावा यासाठी थकीत मालमत्ताकरावरील शास्ती रकमेवर ५० टक्क्यांची सूट देणारी 'अभय' योजना जाहीर करण्यात आली. अशीच अभय योजना पाणी देयकांसाठीही राबविण्यात आली. नागरिकांसाठी सुट्ट्यांच्या दिवशी देयक भरणा केंद्रे सुरू ठेवण्यात आली. या सर्वांचा लाभ नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर घेतला. नवी मुंबई हे झपाट्याने विकसीत होणारे शहर असून शहरातील प्रकल्प व सुविधा कामांचा दर्जा अधिक उत्तम राखण्यासाठी महानगर पालिकेकडे जमा होणारा महसूल अत्यंत महत्वाचा असून सामाजिक जबाबदारीच्या भावनेने विहित वेळेत करभरणा करणाऱ्या व इतरही बाबींमध्ये महानगरपालिकेच्या महसूल वाढीला सहकार्य करणाऱ्या जागरुक नवी मुंबईकर नागरिकांचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

२०२४-२५ या वर्षात सुरू असलेल्या ऑनलाईन पेमेंट सुविधांमध्ये लवकरच भारत बिल पेमंट सिस्टीमची भर घालण्यात येत असून नागरिकांना अत्यंत सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यासोबतच मालमत्ताकराचे वर्षभराचे एक देयक अदा केले जाणार असून नागरिक वर्षभरात टप्प्याटप्प्याने देयक रक्कम भरू शकतात. त्याचप्रमाणे पाणी देयकेही ऑनलाईन उपलब्ध होणार असून सर्व पेंमेंट सुविधेद्वारे ती भरणा करता येतील. तरी या पुढील काळात ही अशाच प्रकारचे सहकार्य नागरिकांकडून लाभेल असा विश्वास आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

# थोडक्यात

## महाबळेश्वर येथे रमजान ईद उत्साहात साजरी



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०१, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथे रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली रमजान ईद (ईद उल फित्र) ईद चा अर्थ आनंद फित्र चा अर्थ गरजूना दान करणे. हा आनंदाने साजरा करणारा सण आहे. रमजान महिन्या मध्ये रोजे (उपवास) मुस्लीम बंधू ठेवतात. या महिन्यात मोठ्या प्रमाणात दान धर्म केला जातो. समजातील गरीब, गरजू, विधवा, निराधार व्यक्तींना मदत केली जाते. रमजान ईद हा सण शत्रुला देखील जवळ करा असा संदेश प्रवाहित करतो. प्रेषित मोंहमद पैगंबरांची शिकवण ही एका विशिष्ठ जातीधर्मापुरती मर्यादित नव्हती तर विश्वाचे कल्याण व्हावे असे त्यांच्या शिकवणीतून प्रदर्शित होते. आपण एक आहोत आपली संस्कृती मातृभुमी एक आहे. त्यामुळे ऐकमेकांच्या कल्याणार्थ जे करता येईल ते आपण केले पाहिजे हाच संदेश रमजान ईद या सणाचा आहे ईदची नमाज पठण झाल्या नंतर महाबळेश्वर येथे मुस्लिम बांधवांनी अलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. महाबळेश्वर येथील रांजणवाडी ईदगाह मैदान, जामा मस्जिद, मिनारा मस्जिद तसेच माचुतर, माहारोळा, नाकिंदा मस्जिद या ठिकाणी ईदची सामुदायिक नमाज पठण करण्यात आली. एकमेकांना व इतर धर्मीयांना ईद च्या शुभेच्छा मुस्लिम बांधवांनी दिल्या ईद निमित्त मशिदींवर व शहरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. एकतेचा व समानतेचा संदेश देणारा रमजान ईद हा सण महाबळेश्वर येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

# लेखी आश्वासन मिळाल्याने २ एप्रिलचे हलगी नाद आंदोलन तात्पुरते स्थगित

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०२, खंडाळा (सातारा) :** दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी चे खंडाळा तहसीलदार ऑफिस समोर तसेच पंचायत समिती खंडाळा या ठिकाणी पाडेगाव तालुका खंडाळा आंबेडकर सोसायटी येथील बेकायदेशीर वराह पालन हटवण्याबाबत निवेदन देऊन ही कुठलीच ठोस कारवाई प्रशासनाने न केल्यामुळे पाठीमागील २४ मार्च २०२५ रोजी प्रशासनाला निवेदन देऊन अल्टिमेटम दिला होता की लवकरात लवकर पाडेगाव आंबेडकर सोसायटीमधील बेकादेशीर वराह पालन हटवावे.

अन्यथा येणाऱ्या दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी झोपेचे सोंग घेतलेल्या प्रशासनाला जाग येण्यासाठी हलगीनाद आंदोलन करू असा इशारा देण्यात आला होता. याबाबत प्रशासनाने ग्राम पंचायत पाडेगाव तालुका खंडाळा येथे मिटींगचे आयोजन केले होते. मीटिंगमध्ये संबंधित वराह पालन मालक माने व इतर जणांनी लेखी आश्वासन दिले आहे की येणाऱ्या २० दिवसात आम्ही पाडेगाव आंबेडकर सोसायटी लोकवस्ती मधील वराह पालन हटवू व तेथून दुसरीकडे २-४ किलोमीटरवर शिफ्ट करू असे लेखी दिल्यामुळे दिनांक ०२ एप्रिल चे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ) तसेच वीर योध्दा प्रतिष्ठानचे खंडाळा तहसीलदार ऑफिस समोर तसेच पंचायत समिती खंडाळा समोरील हलगी नाद आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात येत असल्याचे आरपी आय (अ), वीर योद्धा प्रतिष्ठानच्या वतीने जाहीर करण्यात आले. ही मीटिंग घडवून आणण्याकामी पाडेगाव ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, पोलीस प्रशासन यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच पाठीमागील निवेदन दिल्यानंतर हा विषय पत्रकार बंधूंनी उचलून धरल्यामुळे त्याला गती प्राप्त झाली.



पाडेगाव आंबेडकर सोसायटी मधील बेकायदेशीर वराह पालन हटवावे. यासाठी पत्रकार मित्रांनी ज्या प्रकारे बातम्या प्रसिद्ध केल्या व हा विषय उचलून धरला त्या सर्वच पत्रकार मित्रांचे मनःपूर्वक धन्यवाद यावेळी आर.पी.आय(अ) व वीर योद्धा प्रतिष्ठानच्यावतीने मानण्यात आले.

पाडेगाव ग्रामपंचायत मध्ये झालेल्या मीटिंगमध्ये वीर योद्धा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब ढावरे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे खंडाळा तालुका अध्यक्ष तथा वीर योद्धा प्रतिष्ठान सातारा जिल्हा कार्याध्यक्ष पवन धायगुडे पाटील, वीर योद्धा प्रतिष्ठान कोर कमिटी सल्लागार तथा आरपीआय खंडाळा तालुका सल्लागार अनिल केदारी, वीर योद्धा प्रतिष्ठान खंडाळा तालुका अध्यक्ष सलीम भाई शेख, वीर योद्धा प्रतिष्ठान खंडाळा तालुका कार्याध्यक्ष चांदभाई शेख, अवघडे, ओंकार धायगुडे, ग्रामविकास अधिकारी,पाडेगाव बीट अंमलदार पाडेगाव भिसे, पोलीस पाटील पाडेगाव, सरपंच, उपसरपंच, सदस्य पाडेगाव आंबेडकर सोसायटी मधील ग्रामस्थ तसेच आरपीआयचे तसेच वीर योध्दा प्रतिष्ठानचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## नेप्तीत हनुमान कथा संगीत कथा ज्ञानयज्ञास प्रारंभ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील नेप्ती येथे श्रीराम नवमी निमित्त श्रीराम सेवा मंडळ व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम मंदिरासमोर हनुमान कथा संगीत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच श्रीराम विजयग्रंथ व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती रामदास फुले यांनी दिली आहे. या सोहळ्याचे उद्घाटन आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी प्रतिमा पूजन, ग्रंथ पूजन करून कथेला प्रारंभ करण्यात आला. कथा प्रवक्ते ह.भ.प.संभाजी महाराज शिंदे बोधेगाव हे आहेत. ही कथा ३१ मार्च ते ७ एप्रिल २०२५ पर्यंत रात्री ८ ते ११ या या वेळेत होणार आहे. या कथेला तबला जितेंद्र महाराज आमले आळंदी, सिंथ वादक बळीराम महाराज गिरी, साऊंड सिस्टिम तुषार भुजबळ तर बासरी वादक बाबासाहेब भोर यांची साथ संगत असणार आहे. यावेळी श्रीराम सेवा मंडळाचे अध्यक्ष बबन फुले, उपाध्यक्ष बाळासाहेब होळकर, रामदास फुले, माजी सरपंच दिलीप होळकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर उद्योजक दिलीप दाते, बापू सोनवणे, बबन बेल्हेकर, एकनाथ होले, बाळासाहेब बेल्हेकर, मारुती कावरे, चंद्रकांत खरमाळे, बबन शिंदे, अशोक गवळी, देवराम जपकर ,सुरेश चत्तर, जालिंदर शिंदे, टिल्लू जवणे,एकनाथ होळकर, श्रीनिवास महाराज जपकर, बाबासाहेब जाधव, विष्णू गुंजाळ, अशोक जपकर, बाबासाहेब होळकर उमर सय्यद, योगेश कुलकर्णी, बंडू रावळे, भानुदास फुले, राजू फुले, राजाराम जपकर यांच्यासह श्रीराम सेवा मंडळाचे सर्व सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण झाले असून संपूर्ण गाव भक्तीमय झाला आहे. हा सोहळा गावकऱ्यांसाठी मोठी पर्वणी ठरत आहे. सोहळ्यानिमित्त मंदिर परिसर स्वच्छ करून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. सोहळ्याचे हे ३६ वे वर्ष आहे. दिनांक ६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी राम जन्माचे किर्तन होईल. दिनांक ७ एप्रिल रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे. रावसाहेब भागीनाथ होळकर यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# २१ व्या शतकातील आव्हाने !

बदल हा निसर्गाचा नियम आहे. आपल्या आजूबाजूला अनेक गोष्टी झपाट्याने बदलत आहेत.' सक्षम ते जगतील' असा सांगणारा नैसर्गिक निवडीचा सिद्धांत चार्ल्स डार्विन यानी मांडला. आता २१ व्या शतकात मानवी लढाई ही जगण्या मरण्याची नसली, तरी आपल्या जगण्याचा अर्थ शोधणारी नक्कीच आहे.

एकविसावे शतक सुरू होऊन या शतकाची २५ वर्षे हा हा म्हणता निघून गेली. गेलेल्या २५ वर्षात या शतकाला दिशा देण्याचे काम नक्कीच झाले. २०४७ मध्ये भारत आपल्या स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करेल. महासत्तेकडे वाटचाल करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या आपल्या देशाला त्या स्वप्नाकडे घेऊन जाणाऱ्या आजच्या पिढीला खूप कष्ट घ्यावे लागणार आहे. म्हणून नव्या शतकाच्या बदलाचा ट्रेंड तरुण पिढीला माहित असणे आवश्यक आहे. भाषा, संस्कार, संस्कृती, तंत्रज्ञान ही आजच्या बदलत्या जगाची चार चाके आहेत.

२० वे शतक हे टोकाच्या मानवी संघर्षाचे होते. याच शतकात भांडवलशाही आणि त्यातून निर्माण झालेला वसाहतवाद यामुळे वर्चस्वादी वृत्तीतून मानव जातीने दोन महायुद्धे पाहिली. यातून मानवाला फार मोठा धडा मिळाला. ' स्वातंत्र्य ' हीच प्रत्येक देशाची आणि व्यक्तीची महत्त्वपूर्ण गरज आहे; हे ओळखून शतकाच्या उत्तरार्धात अनेक देश युरोपीय देशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाले.

आज एकविसाव्या शतकातील जग हे विसाव्या शतकापेक्षा अनेक बाबतीत भिन्न आहे. विसाव्या शतकात इंग्रजी ही जागतिक भाषा बनू पाहत होती. ती ज्ञानभाषा म्हणून नावारूपाला देखील आली. १९९० नंतर झपाट्याने झालेल्या जागतिकीकरणानंतर जग खूप जवळ आले.परस्परांना संपर्क करण्यासाठी इंग्रजी भाषेला प्राधान्य देण्यात आले. त्याचबरोबर एकविसाव्या शतकात स्थानिकतेला प्रत्येक देशाने अस्मिता बनवत आपली मातृभाषा मृतवत होऊ नये ; म्हणून शिक्षण आणि रोजच्या व्यवहारात आपापल्या भाषेला त्या त्या देशाने प्राधान्य दिले. आज २१ व्या शतकात ' मल्टी लैंग्वेज स्किल ' ही संकल्पना जोर धरत आहे. एन. ई. पी.२०२० ( नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ) मध्ये त्याचे प्रतिबिंब आपल्याला पाहायला मिळत आहे. आता येणाऱ्या पिढीला अनेक भाषा शिकाव्या लागणार आहेत. त्यांना आपल्या कौशल्यानुरूप नोकरी ज्या देशात असेल,तेथील भाषा कमीत कमी वेळेत शिकून घ्यावी लागणार आहे.

संस्कार हे शरीर,मन आणि बुद्धी यावर केले जाते.आज २१ व्या शतकात संस्कार देण्याचे काम फक्त पालक, शिक्षक यांच्या कडून घडत नसून प्रसार माध्यमे ही आजच्या काळात मुख्य ' संस्कार केंद्रे ' बनली आहेत. ' व्हाट्सअप विद्यापीठ ' अशा उपरोधक पद्धतीने या समाज माध्यमांना विचारवंत लोक नावं ठेवत आहेत.यामध्ये मोठ्या प्रमाणात तथ्य आहे. कारण ही समाज माध्यमे चुकीचे संस्कार नवीन पिढीवर लावत आहेत. खोट्या गोष्टी रंजक, भडक पद्धतीने मांडल्या जात आहेत.सतत मोबाईल मध्ये तोंड खूपसून बसलेल्या मुलांचे ' ब्रेनरॉट ' होत आहे. अशा काळात योग्य संस्कार देण्यासाठी अधिकृतता आवश्यक बनली आहे. त्यामुळे पालक आणि शिक्षकाची भूमिका वाढली आहे.

' संस्कृती ' म्हणजे जीवन जगण्याची पद्धत होय.एकविसाव्या शतकात संस्कृती ही अनेक संस्कृतीचे मिश्रण बनत आहे. सकाळी न्याहारीसाठी ब्रेड,बिस्कीट खाणारा भारतीय दुपारी जेवणात भाजी-भाकरी खातो. तोच संध्याकाळी पुन्हा चायनीज,इटालियन किंवा अमेरिकन पिझ्झा बर्गर खाऊन पोट भरतो. अशाप्रकारे आजचा काळ हा मिश्र संस्कृतीचा काळ आहे. हे मिश्रण होत असताना अंतरविरोध, अस्मिता, देशाभिमान,अर्थकारण अशा अनेक बाबींना यामध्ये महत्त्व येत आहे.

तंत्रज्ञानातून समृद्ध आणि स्वयंपूर्ण होणे हा २१ व्या शतकाचा प्रत्येक देशाचा ' सक्सेस फॉर्मुला ' ठरणार आहे. शिक्षण, आरोग्य,पायाभूत सुविधा, संशोधन अशा अनेक बाबतीत अभूतपूर्व अशी उत्क्रांती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होत आहे. यातून मानवी जीवन उंचावत आहे. ' आर्टिफिशल इंटेलिजन्सी ' चा वापर मानवाच्या सर्व मूलभूत क्षेत्रांना व्यापून टाकत आहे. त्यातून मानवी सर्जनशीलता धोक्यात येत आहे. माणूस आणि तंत्रज्ञान हा संघर्ष एकविसाव्या शतकात उफाळून येणार आहे. येत्या काळात तंत्रज्ञानाचा नैतिकतेने वापर केला जावा, ही मागणी मानवतावादी कार्यकर्त्यांकडून होऊन नव्या चळवळी निर्माण होणार आहेत. युद्धतंत्र पूर्णपणे स्वयंचलित करण्याकडे अनेक देशांचा कल दिसत आहे. मानवी हस्तक्षेपाशिवाय होणारी युद्धे ही किती भयानक पातळीवर लढली जातील ; याचा अंदाज आजच्या घडीला कोणीही बांधू शकत नाही.

अशाप्रकारे एकविसावे शतक हे संस्कार,संस्कृती आणि तंत्रज्ञान या सर्व पातळ्यावर आव्हानात्मक असणार आहे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## टाकळी ढोकेश्वर ला वादळ, वारा गारपिटीसह जोरदार पाऊसाची हजेरी कांदा, आंबा पिकाचे नुकसान

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** अंगाची लाहीलाही करणाऱ्या तीव्र उकाड्यानंतर पारनेर, संगमनेर तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने बुधवारी सायंकाळी दमदार हजेरी लावली. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर परिसरात निवडुंगेवाडी, वडगाव सावताळ, खडकवाडी वासुंदे काकणेवाडी गारपिटीसह झालेल्या पावसाने अंतिम टप्प्यात असणाऱ्या गावरान आंबा व कांदा हंगामावर संकट उभे ठाकले असल्याचे अहमदनगर भाजप जिल्हा मोर्चाचे अध्यक्ष शिवाजी रोकडे व सामाजिक कार्यकर्ते संदीप थोपटे यांनी दैनिक अक्षराज शी बोलताना दिली. आज सकाळपासून जिल्ह्यात ढगाळ हवामान होते. यामुळे तपमान ३६ अंश सेल्सियस असताना ३७ अंश भासत होते. हवेतील आद्रता ४० टक्के असताना सायंकाळी ढगांची आकाशात गर्दी होऊन पूर्वेकडील वाऱ्यासोबत पावसाचे आगमन झाले. पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर परिसरात गारपीटीसह पाऊस झाला, तर संगमनेर तालुक्यातील पठारावरील साकुर परिसरात काही भागांत पाऊस झाला.

## महसूल विभागाच्या वतीने, 'जिवंत सातबारा मोहीम'

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०१, मुदखेड (नांदेड) :** राज्य शासनाच्या महसूल विभाग १०० दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत, दि.०१ एप्रिल २०२५ पासून जिवंत सातबारा मोहीम, राबविण्यात येत असून सदर मोहिमे अंतर्गत सातबारावरील मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. तरी जे खातेदार मयत असतील त्यांच्या वारसांनी अर्ज, वारसा बाबत चे प्रतिज्ञापत्र, पोलिस पाटील /ग्राम पंचायत दाखला, मृत्यू दाखला इ.कागद पत्रे आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी तलाठी यांचे कार्यालयात १५ दिवसांत सादर करावेत असे आवाहन तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी केले आहे.